


# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – चौथी (10 जुलै) माझा अभ्यास

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस दहावा :

CLICK HERE



गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

खालील प्रश्नोत्तरे सराव कर.

टेस्ट सोडवा

## २. बोलणारी नदी

**प्र. २. खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या मनाने लिहा.**

(अ) तुम्हांला काय खावेसे वाटते?

(आ) घरातील मोठी माणसे कोणते पदार्थ खाऊ नयेत, असे सांगतात ?

(इ) तुम्हांला कंटाळा आल्यावर काय करावेसे वाटते ?

**प्र. ३. दोन अक्षरी शब्द – गळा, तीन अक्षरी शब्द – घोटाळा, चार अक्षरी शब्द – घळाघळा यांसारखे शेवटी 'ळा' हे अक्षर येणारे प्रत्येकी चार शब्द लिहा.**

**प्र. ४. कोण, कोणाला म्हणाले ?**

(अ) ''नको बुडवू शाळा.''

(आ) ''काय खाऊ आणलास ?''

(इ) ''तू बदामी पेढे नदीत टाकलेस !''

(ई) ''काय गं लीला, नदी तुझ्याशी बोलते ?''

**प्र. ५. खालील शब्दांचे अनेकवचन करा.**

(अ) डबा (आ) बैल (इ) नदी (ई) डोळा (उ) दिवस (ऊ) पेढा

**प्र. ६. लीलाप्रमाणे तुम्हांला नदीशी बोलायचे असेल, तर तुम्ही नदीशी काय बोलाल ?**

**प्र. ७. या पाठात 'वावर' हा शब्द आलेला आहे. वावर या शब्दाचे दोन अर्थ सांगणारी खालील वाक्ये वाचा.**

- रामजीच्या वावरात कापसाचे पीक आहे. (वावर–शेत)
- सरपंचांच्या घरात लोकांचा नेहमी वावर असतो. (वावर–वर्दळ, ये–जा.)

याप्रमाणे दोन अर्थ असलेले पाच शब्द शोधा. प्रत्येक शब्दाचे दोन अर्थ दाखवणारी वाक्ये लिहा.

**उपक्रम :** शिक्षक किंवा पालक यांच्यासोबत तुमच्या गावातल्या नदीवर जा. नदीचे निरीक्षण करा. वहीत नोंदवा.



खालील संख्यांची उजळणी करा.

टेस्ट सोडवा

# २. संख्याज्ञान

## तीन अंकी संख्या : उजळणी

◆ खालील उदाहरणे सोडवा.

१. [१], [२], [३], [४], [५], [६], [७], [८], [९], [0] यांपैकी अंककार्डे वापरून तीन अंकी दहा संख्या तयार करा व वाचा. (शतकस्थानी 0 घेता येणार नाही हे लक्षात घ्या.)

२. खालील संख्या अक्षरांत लिहा.

(१) ३२५ (२) ५४९ (३) ६६७ (४) ७८२ (५) ८९0 (६) ४0१

३. खालील संख्या अंकांत लिहा.

(१) एकशे दोन (२) तीनशे वीस (३) पाचशे सदुसष्ट
(४) चारशे पंचेचाळीस (५) नऊशे नव्याण्णव (६) सातशे छप्पन्न




४. क्रमाने पुढच्या संख्या लिहा.

(१) ३९९, [ ], [ ], [ ]
(२) २00, [ ], [ ], [ ]
(३) ५९७, [ ], [ ], [ ]

५. क्रमाने मागच्या संख्या लिहा.

(१) [ ], [ ], [ ], ६00
(२) [ ], [ ], [ ], ३६९
(३) [ ], [ ], [ ], २९९

## चार अंकी संख्या

| प्रतीके | संख्या | संख्येचे वाचन |
|---|---|---|
|  | १000 | एक हजार |
|  | ४000 | चार हजार |
|  | २0१२ | दोन हजार बारा |
|  | २२0३ | दोन हजार दोनशे तीन |
|  | १0१0 | एक हजार दहा |
|  | १00१ | एक हजार एक |
|  | २३१४ | दोन हजार तीनशे चौदा |

Review the following numbers..

टेस्ट सोडवा

# 2. Number Work

## Three-digit numbers : Revision

- Solve the following examples.

1. Using any of these number cards make ten three-digit numbers and read them. (Remember that you cannot have zero in the hundreds place.)

   [1], [2], [3], [4], [5], [6], [7], [8], [9], [0]


2. Write the following numbers in words.
   (1) 325 (2) 549 (3) 667 (4) 782 (5) 890 (6) 401

3. Write the following numbers in figures.
   (1) Hundred and two
   (2) Three hundred and twenty
   (3) Five hundred and sixty-seven
   (4) Four hundred and forty-five
   (5) Nine hundred and ninety-nine
   (6) Seven hundred and fifty-six

4. Write the next three numbers.
   (1) 399, ☐, ☐, ☐
   (2) 200, ☐, ☐, ☐
   (3) 597, ☐, ☐, ☐

5. Write the three previous numbers.
   (1) ☐, ☐, ☐, 600
   (2) ☐, ☐, ☐, 369
   (3) ☐, ☐, ☐, 299

## Four-digit numbers

| Symbols | Numbers | Read as |
|---|---|---|
|   | 1000 | One thousand |
|   | 4000 | Four thousand |
|   | 2012 | Two thousand and twelve |
|   | 2203 | Two thousand two hundred and three |
|   | 1010 | One thousand and ten |
|   | 1001 | One thousand and one |
|   | 2314 | Two thousand three hundred and fourteen |

टेस्ट सोडवा

**Read and enact.**

**Revision**

## A GARDEN OF WORDS

| | | | | |
|---|---|---|---|---|
| a | easily | many | said | time |
| and | five | more | shall | to |
| at | gave | not | she | too |
| began | hand | now | smile | took |
| but | her | of | smiled | two |
| came | I | one | some | wanted |
| come | in | only | take | was |
| could | it | out | ten | what |
| cry | liked | put | the | will |
| do | looked | quickly | there | would |

**1. Listen carefully and tick off the words in your chart.**

* and * but * one * five * ten * will * liked
* took * cry * it * do * put * there * now

**2. Find all the three-letter words and copy them in your notebook.**

**3. Read the word. From any poem, say a line that has the word.**

**Example :** began : And they began to cry.

* and * her * one * some * will

वरील तक्त्यातील प्रत्येक शब्दासाठी 8 x 4 cm किंवा अन्य आकारात जाड कागदाची कार्डे प्रत्येक मुलाकडून करून घ्यावीत. ती मुलांजवळच ठेवावीत. इंग्रजीच्या तासाव्यतिरिक्त एरवीही गटात किंवा एकट्याने खेळण्याजोगे अनेक सोपे खेळ या कार्डांच्या मदतीने घेता येतील. प्रत्येक मुलाला चांगल्या प्रकारे स्वतः लिहिलेला शब्द वारंवार व वेगवेगळ्या संदर्भांत हाताळायला मिळणे महत्त्वाचे आहे. कार्डांवरील शब्द चार रेघांत लिहिण्याची आवश्यकता नाही.

• तक्त्यातील व कार्डांवरील शब्द मुलांकडून वाचून घ्यावे. **1.** शिक्षकांनी पुस्तकात दिलेल्या क्रमापेक्षा वेगळ्या क्रमाने सावकाश एकेक शब्द सांगावा. मुलांनी आपल्या पुस्तकात/कार्डांमधून तो शब्द शोधावा. **3.** मुले जे शब्द तोंडी शिकली, त्यांची लेखन–वाचनात **योग्य त्या संदर्भासह उजळणी** व्हावी असा या स्वाध्यायाचा हेतू आहे. शब्द ऐकून किंवा कार्डावरील शब्द पाहून मुलांनी कोणत्याही कवितेतील तो शब्द असणारी ओळ म्हटली तरी चालेल. (त्यासाठी शिक्षकांनी तिसरीपर्यंत झालेल्या सर्व कविता माहीत करून घेणे आवश्यक आहे.) मुलांचे गट/जोड्या करून नंतरही या स्वाध्यायाचा **नियमित वापर करावा.**

उतारा वाचा व समजून घ्या.

## २. सजीवांचे परस्परांशी नाते

वाघाचेच पहा ना ! वाघाच्या अंगावर पट्टे असतात. सावजासाठी वाघ गवतात दबा धरून लपून बसतो. पण अंगावरच्या पट्ट्यांमुळे सावजाला वाघाचा पत्ता लागत नाही. शिवाय गवताळ प्रदेशात हरणे, नीलगाई, गवे असे प्राणी असतात. भूक लागली की ते खाऊन वाघ आपले पोट भरू शकतो. उन्हाळ्यात सुद्धा आटणार नाही असा पाणवठा जवळपास असावा लागतो. या प्रदेशात डोंगरही असावे लागतात. म्हणजे निवाऱ्यासाठी वाघाला गुहा मिळू शकते.

या साऱ्या गोष्टी जिथे असतील तिथेच वाघोबाचे वास्तव्य असते.

टेस्ट सोडवा











वाघ कुठे राहतो ?

### सांगा पाहू

- रेशीम माणसाला कोठून मिळते ?
- झाडांचा उपयोग पक्ष्यांना कसा होतो ?
- झाडांचा उपयोग माकडांना कसा होतो ?
- वाळवीने झाड पोखरले तर काय होते ?

आपल्या काही गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून माणूस विविध प्राणी पाळतो. पाळलेल्या प्राण्यांवर अपार माया करतो. पाळलेल्या प्राण्यांची तो नीट काळजी घेतो. त्यांना खाऊपिऊ घालतो. प्राणी आजारी पडले तर त्यांच्यावर उपचार करतो.

## २. संतांची कामगिरी

टेस्ट सोडवा

# वाचा व समजून घ्या.

देहू गावचे राहणारे. त्यांच्या घरी शेतीभाती होती. त्यांचे किराणा मालाचे दुकानही होते. त्यांचे वाडवडील अडल्यानडल्यांना कर्ज देत; पण तुकारामांनी आपल्या वाटणीची कर्जखते इंद्रायणी नदीमध्ये बुडवली आणि अनेकांना कर्जमुक्त केले. जवळच्या डोंगरावर जाऊन ते विठ्ठलाचे भजन करत. आषाढी-कार्तिकीला पंढरीला जात. कीर्तन करत, अभंग रचत आणि ते अभंग लोकांना म्हणून दाखवत. हजारो लोक त्यांच्या कीर्तनाला येत. शिवरायसुद्धा त्यांच्या कीर्तनाला जात असत. संत तुकाराम लोकांना दया, क्षमा, शांती यांची शिकवण देत, समतेचा उपदेश करत –

'जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा।'

हा संदेश त्यांनी लोकांच्या मनावर बिंबवला. लोकांच्या मनात विचार जागे केले. लोक संत तुकारामांचा जयजयकार करू लागले. आजही महाराष्ट्रभर आपल्याला 'ग्यानबा-तुकाराम' हा जयघोष ऐकू येतो. ज्ञानेश्वरांनाच 'ग्यानबा' असे म्हणतात. 'तुकारामगाथा' आजही घरोघरी वाचली जाते.

**समर्थ रामदास :** त्याच काळात महाराष्ट्राच्या कडेकपारीत 'जय जय रघुवीर समर्थ' अशी रामदासांची गर्जना घुमत होती. त्यांचा जन्म मराठवाड्यात गोदावरीच्या काठी जांब या गावी रामनवमीच्या दिवशी झाला. रामदासांचे



समर्थ रामदास

मूळ नाव नारायण, पण ते स्वत:ला 'रामाचा दास' म्हणू लागले. 'दासबोध' या त्यांच्या ग्रंथातून त्यांनी लोकांना मोलाचा उपदेश केला. तसेच त्यांच्या मनाच्या श्लोकांतून त्यांनी लोकांना सद्विचार व सद्वर्तन यांची शिकवण दिली. बलोपासनेसाठी त्यांनी ठिकठिकाणी हनुमानाची मंदिरे उभारली. लोकांना शक्तीची उपासना करण्यास शिकवले. 'सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे', हा संदेश त्यांनी लोकांना दिला. रामदासांनी लोकांना संघटना करण्याची व अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची स्फूर्ती दिली. त्यामुळे त्या काळच्या लोकांना धीर आला.

साधुसंतांच्या कार्यामुळे लोकजागृती झाली. धर्माबद्दल आदर वाढला. लोकांच्या मनांत आत्मविश्वास निर्माण झाला. संतांच्या कामगिरीचा शिवरायांनी स्वराज्यस्थापनेसाठी उपयोग करून घेतला.

### स्वाध्याय

१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(अ) संत नामदेव ............ निस्सीम भक्त होते.

(आ) ज्ञानेश्वरांनी तरुण वयात पुण्याजवळ ........... येथे जिवंत समाधी घेतली.

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाउनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाउली शैक्षणिक ॲप्स – Click Here